# गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समुदायामील महिलांच्या राजकीय जाणिवेचे अध्ययन.

**प्रा. डॉ. गणेश बी. खुणे**, महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी. ता. चामोर्शी, जि.गडचिरोली. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली. Mo. No. 9834337271 email-gkhune@rediffmail.com,

---

**गोषवारा-**

पंचायत राज व्यवस्थेने महिलांना 50 टक्के आरक्षणाची व्यवस्था केली व पुरुषी वर्चस्वापासून महिलांना मुक्त करून महिलांच्या हातात सत्तेची सूत्रे सोपवून पुरुषांच्या बरोबरीने सत्ता चालवण्याची संधी उपलब्ध करून दिली. या कायद्याने महिलांच्या हातात सत्तासूत्रे सोपविली. या कायद्याने आदिवासी महिला पहिल्यांदाच घराबाहेर पडू लागली व आपल्या मिळालेल्या अधिकाराचे निर्वहन करू लागली. त्यामुळे या महिलांच्या राजकीय ज्ञानात भर पडत चालली असून त्याचा फायदा ते सत्ता चालविण्यासाठी करतांना दिसून येतात. सोबतच शिक्षणाचा वाढता प्रवाह या बाबीला महत्त्वपूर्ण आधार ठरला. महिलांच्या राजकीय जाणिवा सचेत झाल्याने केवळ त्या “चूल व मूल” इथपर्यंतच मर्यादित न राहता घराबाहेर पडू लागल्या. राज्य व केंद्र स्तरावरील राजकारणाचे त्यांना ज्ञान होऊ लागले. एकूणच आदिवासी महिलांमध्ये दिवसेंदिवस राजकीय जाणीव जागृती निर्माण होत असल्याचे दिसून येते. महिलांमध्ये होत असलेल्या राजकीय चेतनेमुळे महिलांचे भविष्य उज्वल होत आहे असे स्पष्ट होते.

बीजसंज्ञा-

आदिवासी महिला, राजकीय जाणिवा, गडचिरोली जिल्हा, महिलांची राजकीय स्थिती, आदिवासी समुदाय.

**प्रस्तावणा-**

गडचिरोली हा महाराष्ट्रातील अत्यंत दुर्लक्षित, वनाच्छादित व दुर्गम जिल्हा म्हणून ओळखला जातो. आरोग्य. दळणवळण. रस्ते. संचार माध्यमे, सिंचन, कृषी, शिक्षण अशा अनेक बाबतीत सदर जिल्हा संपूर्ण महाराष्ट्राच्या तुलनेत मागासला आहे. या जिल्ह्यात 40 टक्के आदिवासी समुदाय असून या समुदायाला गृहीत धरल्याशिवाय सदर जिल्ह्यातील राजकारण करणे कोणत्याही पक्षाला सहज शक्य नाही. त्यामुळे राजकीय पक्षांना या समूहावर कटाक्षाने पूर्ण लक्ष द्यावे लागते. निवडणूक कोणतीही असो सदर समाजाच्या अस्तित्वासाठी किंबहुना या समाजातील मतदारांना समोर ठेवणे प्रत्येकच राजकीय पक्षांना अगत्याचे ठरते. " चंद्रपूर गडचिरोली भागातील स्त्री नक्षलवाद्यांच्या लैंगिक अत्याचारांना बळी पडतांना दिसतो. तर दुसरीकडे पोलिस अधिकारी देखील स्त्रियांची विटंबना करतात या सगळ्या विटंबनेच्या इतिहासात आदिवासींना मुख्य धारेत आना म्हणजे नेमके काय करा हा प्रश्न सुटत नाही. आदिवासी स्त्री पुरुषांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय लूटमार करून त्यांना देशोधडीला लावण्याचे उद्योग सर्रास सुरू आहेत. त्याचा पहिला बळी आदिवासी स्त्री आहे."[1] पंचायत राजव्यवस्थेत स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत झुकते माप दिले असल्याने अनेक वर्षापासून पुरुषी वर्चस्वाखाली दबलेल्या या प्रवर्गाला पहिल्यांदाच पुरुषांच्या बरोबरीने राजकीय क्षेत्रात आपली छाप पाडण्याची संधी उपलब्ध झाली. किंबहुना अनेक स्त्रीयांनी पुरुषांच्या तुलनेत आपली अमीट छाप निर्माण केली आहे. पंचायत राजव्यवस्थेमुळे सदर महिलांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशाच्या जडणघडणीत महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्याने, त्यांच्या अस्तित्वाने व्यवस्थेवर त्यांची अमीट छाप निर्माण झाली आहे. किंबहूना प्रत्येकच व्यवस्थेचे भवितव्य महिलांच्या राजकीय सहभाग आणि जागृतीवर अवलंबून आहे. एकूणच आदिवासी महिलांच्या राजकीय सहभागावर या जिल्ह्यातील राजकारण अवलंबून आहे. त्यामुळे पंचायत राजव्यवस्थेने आदिवासी स्त्रियांना उपलब्ध करून दिलेल्या संधीचा या जमातीतील महिला कितपत फायदा घेतात की अजूनही पुरुषांच्या प्रेरणेनेच काम करतात याचा शोध घेणे अगत्याचे ठरते. त्यामुळे सदर महिलांच्या राजकीय जाणिवांचा शोध व अभ्यास अनिवार्य ठरतो.

**संशोधन क्षेत्र-**

संशोधन क्षेत्र हे संपूर्ण गडचिरोली जिल्हा असून सदर जिल्ह्यात जिल्ह्यातील आदिवासी जमातीचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 40 टक्के आहे. त्यापैकी निम्म्या प्रमाणात आदिवासी महिला आहेत. या संपूर्ण महिलांची राजकीय जाणीव जागृती व सहभाग संशोधन लेखात तपासला गेला आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**नमुना निवड-**

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी "आदिवासी जमातीची लोकसंख्या 415306 एवढी असून त्याचे प्रमाण जिल्यात जास्त आहे. त्याची टक्केवारी 38.17 टक्के इतके आहे."[2] त्यापैकी आदिवासी महिलांची एकूण लोकसंख्या 50 **टक्केच्या जवळपास** इतकी आहे. त्यामुळे संपूर्ण महिला प्रवर्गाचे अध्ययन करणे अशक्य आहे. त्यामुळे या आदिवासी महिला प्रवर्गातून 600 आदिवासी महिला या नमुना म्हणून निवडण्यात आल्या आहेत. ही निवड सोयीस्कर यादृच्छिक नमुना निवड पद्धती द्वारे करण्यात आली आहे. यामुळे प्रत्येक एकाशी संपर्क साधणे सहज शक्य होईल. यामध्ये 600 महिलांकडून मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली.

**संशोधनाचे महत्त्व-**

गडचिरोली हा अतिदुर्गम, वनाच्छादित, अविकसित व आदिवासीबहुल जिल्हा म्हणून अख्ख्या महाराष्ट्रातच नव्हे तर देशातही ओळखला जातो. सदर जिल्ह्यात आदिवासी समुदाय बहुसंख्येने आहे. त्यामुळे या समाजाला गृहीत धरल्याशिवाय इथे राजकारण अशक्य आहे. त्यामुळे सदर आदिवासी समुदायातील चेतनेचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. पंचायत व्यवस्थेने महिलांना पुरुषांच्या बरोबरीने नेऊन ठेवले. इतकेच नव्हे तर त्यांना झुकते माप दिले व चूल व मूल यात गुंतवून न ठेवता, पुरुषांच्या बरोबरीने येण्यासाठी मार्ग उपलब्ध करून दिला. महिलांनाही पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी दिली. किंबहुना पुरुषी अहंकाराच्या मानसिकतेत स्त्रियांना न ठेवता स्वतःचे वेगळे अस्तित्व पंचायतराज व्यवस्थेत उपलब्ध करून दिले. परंतु वैज्ञानिक दृष्ट्या हे जरी खरे असले तरी पण सदर माहिलांची वास्तविक स्थिती काय, या महिला राजकीय सत्तेत आहेत काय? त्यांच्या जाणिवा जागृत झाल्या आहेत काय? किंवा त्यांना प्राप्त झालेल्या पद प्रतिष्ठेचा वापर त्या स्वतःच्या विवेकबुद्धीने करतात किंवा त्याच्या मागे त्यांच्या सत्तेचा वापर त्यांचे पती किंवा वडील करतात, यासारख्या सर्व बाबींचा अभ्यास होणे गरजेचे आहे. त्याकरिता मुख्यत: या प्रवर्गाच्या महिलांची जाणीव जागृती किंवा राजकीय चेतना तपासणे अगत्याचे ठरते. राजकीय चेतना असल्याशिवाय त्यांना राजकारण, समाजकारण यात पुढचे पाऊल टाकणेही अशक्य आहे. त्यामुळे येथील महिलांच्या राजकीय चेतनेचा, जाणीव जागृतीचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. या अभ्यासाशिवाय महिलांचा राजकीय सहभाग, सत्ता, पद प्राप्ती, पंचायत व्यवस्थेने दिलेले अधिकार, त्यांचा वापर या सर्व बाबींचा योग्य अभ्यास करता येणे अशक्य आहे. त्यामुळे आदिवासी महिलांच्या राजकीय जाणिवा तपासणे अगत्याचे ठरत ठरते.

**संशोधनाचा उद्देश-**

1) जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे राजकीय ज्ञान तपासणे.
2) जिल्ह्यातील आदिवासी महिलांमधील राजकीय जाणीव जागृतीचा शोध- घेणे.
3) महिलांची राजकीय चेतना व जागृती समाजासमोर आणणे.
4) आदिवासी महिलांच्या राजकीय जाणिवांचा शोध घेऊन या महिला पूर्वी प्रमाणेच राजकीय अनभिज्ञ आहेत. आणि चूल व मूल यापर्यंतच मर्यादित आहेत की पुरुषांच्या बरोबरीने समोर येऊन आदिवासी महिला राजकीय प्रक्रियेत सहभागी होत आहेत याचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहीतकृते-**

1) आदिवासी महिलांना राजकीय ज्ञान आहे.
2) महिलांमध्ये राजकीय जाणीव जागृती झाली आहे.
3) केवळ पुरुषच नव्हे तर महिलांही राजकीय दृष्ट्या सचेत होत आहेत.
4) महिला चूल व मूल इथपर्यंतच मर्यादित आहेत.

सारणी क्रमांक **1**

आदिवासी महिलांची जाणीवजागृती संदर्भातील सारणी-**.**

| **अ. क्र.** | **प्रतिसाद** | **उत्तर होय असल्यास** | **उत्तर नाही असल्यास** |
|---|---|---|---|
| | | **वारंवारिता** | **वारंवारिता** |
| 01 | देशाचे नांव माहित आहे | 595 | 05 |
| 02 | राज्याचे नांव माहित आहे | 595 | 05 |

| | | | |
|---|---|---|---|
| 03 | जिल्ह्याचे नांव माहित आहे | 600 | 00 |
| 04 | पंतप्रधानाचे नांव माहीत आहेत | 588 | 12 |
| 05 | खासदाराचे नांव माहित आहे | 563 | 37 |
| 06 | आमदाराचे नांव माहित आहे | 588 | 12 |
| 07 | राजकीय पक्षांचे नांव माहित आहे | 600 | 00 |
| | **एकूण** | **4129** | **71** |

उपरोक्त सारणी वरून 600 पैकी 595 महिलांनी देशाचे नांव माहित आहे. तर केवळ 05 महिला यापासून अनभिज्ञ आहेत. राज्याचे नाव यासंदर्भात 595 महिला, जिल्ह्याचे नांव माहिती यासंदर्भात 600 महिला तर आपल्या देशाचे प्रधानमंत्री कोण यासंदर्भात 588 महिलांनी व खासदार यांचे नांव यासंदर्भात 563 महिलांनी, आमदारांचे नांव यासंदर्भात 588 महिला व राजकीय पक्षांचे नाव माहीत असने यासंदर्भात 600 महिलांनी होकारार्थी मत मांडले. तर उर्वरित महिलांनी त्यात्या - प्रतिसादावर नकारार्थी मत मांडल्याचे दिसून येते.

यावरून हे स्पष्ट होते की, अविकसित, उद्योग विरहित, जंगलव्याप्त प्रदेश, शिक्षणाची साधने अपुरी असणाऱ्या सदर जिल्ह्यातील आदिवासी महिलांची जाणीव जागृती होत असल्याचे दिसून येते. येथील आदिवासी महिलांना भारताच्या राजकारण या संदर्भातील ज्ञान आहे. एकूणच महिलांमधे राजकीय जाणीव जागृती दिसून येत असल्याचे स्पष्ट होते. तर फारच कमी महिलांनी उपरोक्त काही मुद्याच्या संदर्भात नकारात्मक मत नोंदवलेले आहे. अडाणी, अशिक्षितपणा व प्रवाहाच्या अगदी दूर असल्याने किंचितच कमी प्रमाण जे नाहीच्या बरोबरीचे आहे असे दिसून येते.

**निष्कर्ष-**

1) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या राजकीय ज्ञानात भर पडत असून या महिलांमध्ये राजकीय जाणीव जागृती निर्माण झाली आहे.

2) या महिला चूल व मूल इथपर्यंतच मर्यादित नसून त्या पुरुषांच्या बरोबरीने घराबाहेर पडत आहेत. त्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग व राजकीय ज्ञानात वृद्धी होत आहे.

3) या महिलांना स्थानिक स्तरापासून तर केंद्र स्तरापर्यंतचे पायाभूत राजकीय ज्ञान असल्याचे अध्ययनाअंती दिसून येते.

4) महिला घराबाहेर पडत असून त्यांच्यात दिवसेंदिवस शिक्षणाचे प्रमाण वाढत असल्याने त्यांच्यात राजकीय चेतना व जागृती दिसून येत असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ –**

1) सौ वंदना महाजन , आदिवासी स्त्री, मातृसत्ताक व पितृसत्ताक

2) सौ वंदना महाजन संस्क्रती आणि वारसा .